| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 404/2024 | श्री. मंडपे गणेश दगडुबा, रा. पारडगाव ता. घनसावंगी जि. जालना | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग परतुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 02 जालना | |
| 2 | 713/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्तर, जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 3 | 714/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्तर, जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 4 | 715/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 5 | 716/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 6 | 717/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 7 | 718/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | वरिष्ठ लेखा लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 8 | 719/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | निविदा शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 9 | 720/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 10 | 721/2024 | श्री. व्दारकेश रमण गायकवाड, रा. गोपीकिशन बागडियानगर, संतोषीमाता मंदिरामागे, नवीन जालना-431203 | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापुर जि. जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 1605/ 2024 | श्री. प्रतिक संजय देशमुख, रा. ज्ञानेश्वरनगर डी टाईप 28/4, भेंडा ता. नेवास जि. अहमदनगर | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 12 | 1826/ 2024 | श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, रा.घर क्र. 10/8, गजानन हौसिंग सोसायटी जुना मुंकुदनगर औरंगाबाद रोड, अहमदनगर | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जालना | |
| 13 | 9370/ 2024 | श्री. योगेश लक्ष्मण साळवे, मु.पो.माहोरा ता. जाफ्राबाद जि.जालना | शाखा अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती जाफ्राबाद जि. जालना | उप विभागीय अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती जाफ्राबाद जि. जालना | |
| 14 | 4476/ 2024 | श्री. परमेश्वर कोंडीराम कांबळे, मु.पो. जांबसमर्थ ता. घनसावंगी जि. जालना | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग, जालना | उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 10403 /2024 | श्री. धम्मपाल साहेबराव सुरडकर, रा. राजनगर शिवाजी महाराज पुतळ्या जवळ, मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयसमोर, जालना | उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 10404 /2024 | श्री. धम्मपाल साहेबराव सुरडकर, रा. राजनगर शिवाजी महाराज पुतळ्या जवळ, मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयसमोर, जालना | उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 7768/ 2024 | श्री.मंडपे गणेश दगडुबा, रा. परडगांव ता. घनसावंगी जि.जालना | वरिष्ठ भु वैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना | वरिष्ठ भु वैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना | |
| 18 | 11055 /2024 | श्री. पाटील राजीव दामोधर, रा. हरीभाऊ नगर, कृपासदन रोड, लातुर-413512 | वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जालना | वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जालना | |
| 19 | 4551/ 2024 | श्री. तरंग लक्ष्मणराव कांबळे, रा. फुलेनगर अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबड जि. जालना | सहाय्यक निबंधक सहाकारी संस्था, अंबड जि. जालना | |
| 20 | 10916 /2024 | श्री. प्रविण सुभाष पिंपळे, रा. सोनगिरी पो. वरुड बु ता. जाफ्राबाद जि. जालना | सहाय्यक सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जाफ्राबाद जि.जालना | सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जाफ्राबाद जि.जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 2568/2024 | डॉ. लहुकुमार हरिदास खंडाळे, रा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | ज.मा.अ. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | |
| 22 | 4100/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांतनगर, घर नंबर 81, अंबड रोडद्व जालना | ज.मा.अ. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प क्र-02, घनसावंगी जि. जालना | ज.अ.अ. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प क्र-02, घनसावंगी जि. जालना | |
| 23 | 8058/2024 | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे, रा. लक्ष्मीकांतनगर, घर नंबर 81, अंबड रोड, जालना | विस्तार अधिकारी (सांख्यिकी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प 1 व 02 घनसावंगी जि. जालना | बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प 01व 02 कार्यालय घनसावंगी जि. जालना | |
| 24 | 10633/2024 | श्री. प्रा. भागवत अंकुश कराडकर, रा. बनगांव ता. अंबड जि. जालना | मुख्य लिपीक, मॉडेल डिग्री कॉलेज, घनसांवगी जि.जालना | प्राचार्य, मॉडेल डिग्री कॉलेज, घनसांवगी जि.जालना | |
| 25 | 10634/2024 | श्री. प्रा. भागवत अंकुश कराडकर, रा. बनगांव ता. अंबड जि. जालना | मुख्य लिपीक, मॉडेल डिग्री कॉलेज, घनसांवगी जि.जालना | प्राचार्य, मॉडेल डिग्री कॉलेज, घनसांवगी जि.जालना | |
| 26 | 338/2024 | श्री. शेख मन्सुर शेख महेबुब, ग्रीन पार्क कॉलनी, जालना | ज.मा.अ. ओम शांती ज्युनीयर कॉलेज अंबड जि. जालना | मुख्याध्यापक, ओम शांती ज्युनीयर कॉलेज अंबड जि. जालना | |
| 27 | 1630/2024 | श्री. तुकाराम बाबुरावजी मिसाळ, रा. मिसाळ कॉम्प्लेक्स काद्राबाद जालना | ज.मा.अ. सी.टी.एम.के. गुजराती विद्यलय, सरोजनीदेवी रोड, जालना | मुख्याध्यापक, सी.टी.एम.के. गुजराती विद्यलय, सरोजनीदेवी रोड, जालना | |
| 28 | 2416/2024 | श्री. राजु कोंडीबा घोडके, रा. डोणगाव ता. जाफ्राबाद जि. जालना | ज.मा.अ.कृषि विज्ञान केंद्र खारपुरी जालना | ज.अ.अ.कृषि विज्ञान केंद्र खारपुरी जालना | |
| 29 | 5337/2024 | श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर, रा. 29, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर | श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| 30 | 5338/2024 | श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर, रा. 29, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर | श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 5340/2024 | श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर, रा. 29, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर | श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| 32 | 5339/2024 | श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर, रा. 29, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर | ज.म.अ. नवभारत शिक्षण संस्था टेंभुर्णी व्दारा. स्वदेश इंजिनीअर्स, प्लॉट नंबर डी52/21, एम.आय.डी.सी. वाळुज छत्रपती संभाजीनगर | सचिव, नवभारत शिक्षण संस्था टेंभुर्णी व्दारा. स्वदेश इंजिनीअर्स, प्लॉट नंबर डी52/21, एम.आय.डी.सी. वाळुज छत्रपती संभाजीनगर | |
| 33 | 5332/2024 | श्री. प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर, रा. 29, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर | श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | मुख्याध्यापक, श्रीमती. जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, व नवभारत उच्च माध्यामिक विद्यालय टेभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | |
| 34 | 10730/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मेनरोड संगमनेर ता.संगमनेर जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र उत्तर, जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 35 | 10731/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मेनरोड संगमनेर ता.संगमनेर जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र उत्तर, जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 36 | 10732/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मेनरोड संगमनेर ता.संगमनेर जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 37 | 10733/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मेनरोड संगमनेर ता.संगमनेर जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 38 | 11027/2024 | श्री. सौदागर जलील अहेमद अकबर मिया, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 39 | 11029/2024 | श्री. सौदागर जलील अहेमद अकबर मिया, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 40 | 11030/2024 | श्री. सौदागर जलील अहेमद अकबर मिया, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 11031/2024 | श्री. सौदागर जलील अहेमद अकबर मिया, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र दक्षिण जालना | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) वन विभाग, जालना | |
| 42 | 11028 | श्री. सौदागर जलील अहेमद अकबर मिया, रा. गोंदी ता. अंबड जि. जालना | उपवनसंरक्षक (प्रादेशिक) वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 43 | 347/2024 | श्रीमती. शहनाज बानु, रा. प्लॉट नबंर 22,23, बिबी का मकबऱ्या पाठीमागे, रेणुकामातानगर, ताज कॉलनी जवळ, छत्रपती संभाजीनगर | उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र. 01 जालना | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना | |
| 44 | 9183/2024 | श्री. सुनिल गणपत गडकर, रा. घर नबंर 5/04/24, काजीवाडा भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. आर.जी. बागडिया कॉमर्स अ‍ॅण्ड आर. बेझंजी सायन्स कॉलेज, जालना | प्राचार्य. आर.जी. बागडिया कॉमर्स अ‍ॅण्ड आर. बेझंजी सायन्स कॉलेज, जालना | |
| 45 | 1864/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, काली मस्जीद जवळ, जालना | मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 46 | 1865/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, काली मस्जीद जवळ, जालना | मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 47 | 1890/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, काली मस्जीद जवळ, जालना | मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 48 | 1891/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, काली मस्जीद जवळ, जालना | मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 49 | 2514/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय कचरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 50 | 2515/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय कचरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 2516/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय कचरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 52 | 2517/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय कचरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 53 | 2518/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय कचरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 54 | 6109/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 55 | 6110/ 20204 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 56 | 6112/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 57 | 6113/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 58 | 6114/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 59 | 6120/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 60 | 6121/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 6122/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 62 | 6123/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 63 | 6124/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 64 | 6125/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल,रा. हिमायतनगर, प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड काली मस्जीद कचेरी रोड, जालना | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 65 | 705/2 024 | श्री. प्रविण भिमराव भिंगारदेव, रा. मत्स्योदरी कॉलनी, अंबड ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय भिवंडी बोडखा ता. अंबड जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 66 | 5358/ 2024 | श्री. विठ्ठल सुधाकर शेरे, मु.पो. शेवगा ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेवगा ता. अंबड जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 67 | 5359/ 2024 | श्री. विठ्ठल सुधाकर शेरे, मु.पो. शेवगा ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेवगा ता. अंबड जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 68 | 5365/ 2024 | श्री. विठ्ठल सुधाकर शेरे, मु.पो. शेवगा ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेवगा ता. अंबड जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 69 | 6735/ 2024 | श्री. शेख सादीक शेख इस्माईल, रा. हारतखेडा ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय हारतखेडा ता. अंबड जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 70 | 7024/ 2024 | श्री. श्रीहरी पांडुरंग निर्मळ, रा. पाथवला बु ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पाथरवाला बु ता. अंबड जि.जालना | विस्तार अधिकारी पंचायत समिती अंबड जि.जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 7894/2024 | श्री. सोनाजी सत्यभान येडे, रा. हरतखेडा पो. शेवगा ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय हरतखेडा ता. अंबड जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि. जालना | |
| 72 | 8398/2024 | श्री. विद्यानंद विक्रमराव वाघ, मु. माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि.जालना | |
| 73 | 8399/2024 | श्री. विद्यानंद विक्रमराव वाघ, मु. माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि.जालना | |
| 74 | 8400/2024 | श्री. विद्यानंद विक्रमराव वाघ, मु. माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय माहेरभाहेगाव ता. अंबड जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंबड जि.जालना | |
| 75 | 1068/2024 | श्री. जगदीश भानुदास गायकवाड, रा. इब्राहीमपुर ता. भोकरदन जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय इब्राहीमपुर ता. भोकरदन जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 76 | 1069/2024 | श्री. जगदीश भानुदास गायकवाड, रा. इब्राहीमपुर ता. भोकरदन जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय इब्राहीमपुर ता. भोकरदन जि.जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 77 | 5714/2024 | श्री. आनंदा पंडीत कानडे, रा. करजगाव ता. भोकरदन जि. जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय करजगांव ता. भोकरदन जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समित भोकरदन जि.जालना | |
| 78 | 7889/2024 | श्री. सुरेश गंगाराम बनकर, रा. महात्मा फुले नगर (धनगर वाडी), भोकरदन ता. भोकरदन जि. जालना | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय भोकरदन जि. जालना | गट विकास अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि. जालना | |
| 79 | 8389/2024 | श्री. राजु दास आव्हाड, रा. रुम नबंर 174, जय मुरत नगर पाठक चाळ, दिनकारी रोड, पांजरापोळ चेंबुर मुंबई-400088 | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मालखेडा ता. भोकरदन जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि.जालना | |
| 80 | 8483/2024 | श्री. विठ्ठलसिंग रामराव मोरे, मु. पारध खुर्द पो. पारध बु ता. भोकरदन जि.जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पारध खुर्द ता. भोकरदन जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि.जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 04.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 81 | 8484/2024 | श्री. विठ्ठलसिंग रामराव मोरे, मु. पारध खुर्द पो. पारध बु ता. भोकरदन जि.जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पारध खुर्द ता. भोकरदन जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि.जालना | |
| 82 | 8485/2024 | श्री. विठ्ठलसिंग रामराव मोरे, मु. पारध खुर्द पो. पारध बु ता. भोकरदन जि.जालना | उपविभागीय अभियंता (बांधकाम) पंचायत समिती कार्यालय भोकरदन जि.जालना | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद जालना | |
| 83 | 11098/2024 | श्री. रमेश जाणु गवळी, मु.पो. सुरंगळी ता. भोकरदन जि.जालना | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सुरंगळी ता. भोकरदन जि. जालना | विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोकरदन जि.जालना | |
| 84 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 85 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 86 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 87 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 88 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 89 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 90 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १३७०/२०२४
बोर्ड क्र.१३

श्री.योगेश लक्ष्मण साळवे,
रा.माहोरा, ता.जाफ्राबाद, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जाफ्राबाद, जि.जालना. : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
बांधकाम विभाग, पंचायत समिती, जाफ्राबाद, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री.हेमराज वाघ उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०८.२०२४ | सन २०२२-२०२४ पर्यंत म्हसरुळ येथील दलित वसतीमध्ये सिमेंट रोडचे किती बजेट आले व ते कशाच्या आधारे खर्च केले माहिती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असुन सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः प्राप्त करुन घेऊन दि.१२.०९.२०२४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, माहिती मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व त्यांनी तसे लेखी स्वरुपात मान्य केले असल्यामुळे विचाराधिन

व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये आयोगास तथ्यांश दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6123 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४४७६/२०२४
बोर्ड क्र.१४

श्री.परमेश्वर कोंडीराम कांबळे,
रा.जांबसमर्थ, ता.घनसावंगी, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.१२.२०२३ | जांबसमर्थ (ता.घनसावंगी) येथील २०१५ ते आज रोजीपर्यंत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध योजने अंतर्गत मी राहत असलेल्या परिसरातील अनुसूचित जातीतील नवबौध्द घटकांच्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेल्या प्रस्तावाच्या मूळ संचिकाची आठ मुद्यांवर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०३.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन

द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/२/११६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ६१२५ दिनांक :- 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
आयुक्त, समाज कल्याण, पुणे.

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०४०३ व १०४०४/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.१५ व १६**

श्री.धम्मपाल साहेबराव सुरडकर, — अपिलार्थी
रा.राजनगर, शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, मुकूंदवाडी,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, जालना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०८.२०२४ | १.कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत जालना जिल्ह्यातील संपूर्ण जिल्ह्यातील जमिनी ग्रामीण शहरी दोन्ही खरेदी केलेल्या व नामंजूर जमिनी याची माहिती, सन २०१३ ते २०२४ पर्यंत,<br>२. पात्र लाभार्थी आणि अपात्र लाभार्थी यांच्या कागदपत्रासहीत,<br>३. जमीन पाहणीस्थळ पाहणी अहवालची सविस्तर माहिती, |
| २३.०८.२०२४ | १. संपूर्ण जालना जिल्ह्यातील आश्रमशाळा प्राथमिक व माध्यमिक शाळा अनुदानित व विनाअनुदानित (शहरी व ग्रामीण) आश्रमशाळेचे सन २०१३ ते २०२४ पर्यंत ऑडिट व ग्राऊंड ऑडिट रिपोर्ट याची माहिती,<br>२. स्वयंसेवी संस्था ही सोसायटी ॲक्ट १९६० सार्वजनिक विश्वस्त कायदा अधिनियम १८५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र याची माहिती,<br>३. संपूर्ण जालना जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळासाठी शासनाकडुन आकस्मिक निधी मिळतो ऑडिट सहीत सविस्तर माहिती, सन २०१३ ते २०२४ पर्यंत, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०३.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदशित करण्यात यावे. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपिलावर वेळेत कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशाई

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6125 दिनांक : 16/6/2025
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
आयुक्त, समाज कल्याण, पुणे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -७७६८/२०२४**
**बोर्ड क्र.१७**

श्री.मंडपे गणेश दगडुबा,
रा.पारडगाव, ता.घनसावंगी, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, श्री.के.बी.चव्हाण, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, श्री.सी.डी.देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, श्री.पि.एम.शेलार उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२४ | मौजे पारडगाव ता.घनसावंगी या ठिकाणी अटल भूजल योजना वर्ष २०२३ ते २०२४ मधील कामाचे इस्टीमेट, एमबी, सीसी व इंजिनिअर यांनी काम अदा करण्याचे अहवाल, बील, काम पूर्णत्वाचे पत्र, बोर, सिमेंट बंधारे नाला याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, मोठ्या व मोघम स्वरुपाची असल्यामुळे मनुष्यबळ व साधन सामग्री या कामी वळवावी लागणार होती. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२९.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करुन त्यांना हवी असलेली माहिती चिन्हांकित करुन दिल्यानंतर या माहितीकरिता त्यांना विहित शुल्काचा भरणा करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी दि.२७.०५.२०२४ रोजी माहितीपोटीच्या रु.५०१/- इतक्या शुल्काचा शासनखाती भरणा केलेला आहे. या नंतर दि.२९.०५.२०२४ रोजी अपिलार्थी यांनी अवलोकनांती मागणी केल्याप्रमाणे २५१ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती

अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अवलोकनांती त्यांच्या माहिती अर्जातील मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देऊन तशी अपिलार्थी यांची पोच घेतलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेली सुसंगत कार्यवाही विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती प्राप्त झालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. तरी माहिती अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमिवर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांना उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन दिल्यानंतर त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना माहिती प्रदान केलेली आहे. अपिलार्थी यांच्या मागणीप्रमाणे माहिती दिली असल्यामुळे ती अपूर्ण आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे योग्य वाटत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहितीचे अवलोकन देऊन अवलोकनांती अपिलार्थी यांच्या मागणीप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व अपिलार्थी यांनी तसे माहिती मिळाली असल्याबाबत लेखीस्वरुपात मान्य केलेले आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये व आज सुनावणीदरम्यान आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही. **प्रसंगावशात, अपिलार्थी हे वारंवार विविध प्राधिकरणाकडे माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करुन, माहिती दिलेली असताना माहिती मिळाली नाही, अपूर्ण माहिती, दिशाभूल करणारी माहिती, चुकीची माहिती ...इ. ऊहापोह करुन, सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरत असल्याचे आयोगाचे मत झालेले आहे.** माहिती अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावि अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची सकारात्मक भूमिका आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6126 दिनांक : 16/6/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११०५५/२०२४**
**बोर्ड क्र.१८**

श्री.पाटील राजीव दामोधर,
रा.हरिभाऊ नगर, कृपासदन रोड, लातूर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक भूवैज्ञानिक,
वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ भूवैज्ञानिक,
भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, घाटी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, श्री.के.बी.देशपांडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक भूवैज्ञानिक, श्री.सी.डी.चव्हाण व प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, श्री.पि.एम.शेलार उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०५.२०२४ | अटल भुजल योजना व जलजिवन मिशन अंतर्गत सन २०२१ ते ३१.०३.२०२४ पर्यंत मधील निविदा मंजूर झालेल्या कामापैकी जालना जिल्ह्यातील बऱ्याच तालुक्यातील झालेल्या कामाचे अंदाजपत्रक व निविदेच्या प्रती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची असुन अशी माहिती एकत्रित करण्याकरिता कार्यालयातील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळविणे आवश्यक आहे. मात्र ही बाब अधिनियमातील कलम ७ (९) नुसार योग्य ठरणार नसल्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०३.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, दि.१४.०६.२०२४ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि या पत्राच्या अनुषंगाने कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी अपिलार्थी यांनी दि.०७.०६.२०२४ रोजी त्यांचे लेखी निवेदन कार्यालयास सादर केलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केलेले आहे की, दि.१४.०६.२०२४ रोजी घरगुती अडचण असल्यामुळे अवलोकनाकरिता दि.२०.०६.२०२४ अशी पुढील

तारीख द्यावी. तसेच या निवेदनामध्ये त्यांनी असे नमूद केलेले आहे की, शासन निर्णयानुसार विनामूल्य माहिती द्यावी व माहिती पाहण्याची गरज नसून माहिती अर्जानुसार पूर्ण माहिती द्यावी. या नंतर अपिलार्थी यांना दि.२४.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, हवी असलेली माहिती कार्यालयात हजर होऊन प्राप्त करुन घ्यावी किंवा मागणी केलेली माहिती अंदाजे ०५ ते ०६ हजार पानांची असल्याने त्यासाठी रु.२/- प्रमाणे रु.१२,०००/- इतके शुल्क भरणा केल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी कार्यालयात हजर झालेले नाही आणि सुचित केल्याप्रमाणे त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा देखील केलेला नाही. त्यामुळे माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्या त्या टप्प्यावर सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन प्रतिसाद दिलेला आहे. मात्र अपिलार्थी यांना माहितीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसत नाही. म्हणून अपिलार्थी यांचे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सुसंगत कार्यवाही केली असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या निवेदनानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीपोटीचे शुल्काचा भरणा करणेबाबत देखील सुचित केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी तशी कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहितीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही. या परिस्थितीत, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर केलेली कार्यवाही व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०७.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6127 दिनांक : 16/6/2025
6127

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४५५१/२०२४
बोर्ड क्र.१९

श्री.तरंग लक्ष्मणराव कांबळे, — अपिलार्थी
रा.फुलेनगर, अंबड, ता.अंबड, जि.जालना

विरुध्द

१ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार कृषि उत्पन्न बाजार समिती यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२४ | सन १९९१ ते आजपर्यंत १७ जानेवारी २०२४ पर्यंत अंबड कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वितरित केलेल्या भूखंडावर बांधकाम करण्यासाठी दिलेल्या बांधकाम परवानगीची प्रत, करारनामाप्रत, बाजार समितीतील करारावर दिलेल्या जागेवर पोटभाडेकरु देण्याबाबत व्यापाऱ्याची बाजार समितीकडे दाखल केलेल्या प्रस्तावाची प्रत तसेच त्यांना दिलेल्या परवानगीची प्रत तसेच वाहन स्थळ नकाशाच्या सर्व छायांकित प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, कृषि उत्पन्न बाजार समितीकडे सादर केलेल्या माहिती अर्जावर अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीस आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबड, जि.जालना यांनी त्यांच्या दि.२४.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविलेले आहे की, कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा अधिनियमातील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नसल्यामुळे माहिती देता येणार नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, काहीही कार्यवाही केली नाही, उडवा उडवीची उत्तरे दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकारातंर्गत माहितीचा अर्ज सादर करुन कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबड, जि.जालना यांचेकडे माहितीची मागणी केलेली आहे. तथापि

कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयासमोर विशेष अनुमत याचिका (SLP) No.३५९३/२०१६ कृषि उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त, गुजरात व इतर या प्रकरणात दि.२९.०२.२०१६ रोजी मा.गुजरात उच्च न्यायालय यांचे प्रकरणात स्थगिती देण्यात आली असुन सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयासमोर अद्याप निर्णयाधिन आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे, या बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतीम होईपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समितीसंदर्भात अपिलार्थी यांनी आयोगासमोर दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोगाने निर्णय पारित करणे यथोचित होणार नाही, या निष्कर्षाप्रत येऊन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम झाल्यानंतर नव्याने माहिती अर्ज सादर करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे उचित ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 6128 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०९११६/२०२४**
**बोर्ड क्र.२०**

श्री.प्रविण सुभाष पिंपळे,
रा.सोनगिरी, पो.वरुड बु., ता.जाफ्राबाद, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ सहायक सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जाफ्राबाद, जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जाफ्राबाद, जि.जालना : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१९.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीचे सहायक सचिव, श्री.सौगणसींह बिसेण व सचिव, श्री.विजय राऊत उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार संबंधित कृषि उत्पन्न बाजार समिती यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०८.२०२४ | जाफ्राबाद कृषि उत्पन्न बाजार समिती जाफ्राबाद यांनी जाहिरात काढुन २०१७ या वर्षात लेखापाल, निरीक्षण, कनिष्ठ लिपिक, शिपाई या पदभरतीसाठी आलेल्या सर्व उमेदवारांच्या अर्जाच्या साक्षांकित प्रती, पात्र उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र ठरवून मुलाखतीस बोलवण्यात आलेल्या उमेदवाराच्या मुलाखतीस हजर राहण्यासाठी देण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती तसेच वृत्तपत्रातून देण्यात आलेल्या जाहिरात खर्चाची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, कृषि उत्पन्न बाजार समितीकडे सादर केलेल्या माहिती अर्जावर अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीस आदेशित करण्यात यावे.

संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीचे सहायक सचिव यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयासमोर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहिती अधिकारातंर्गत अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती देता येणार नाही. ही बाब अपिलार्थी यांना दि.३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळवून माहिती अर्ज निकाली काढलेला आहे.

संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सहायक सचिव यांनी घेतलेली भूमिका योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थीने दाखल केलेले प्रथम अपील दि.१८.११.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे उत्तर मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकारातंर्गत माहितीचा अर्ज सादर करुन कृषि उत्पन्न बाजार समिती, जाफ्राबाद, जि.जालना यांचेकडे माहितीची मागणी केलेली आहे. तथापि कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा.सवोच्च न्यायालयासमोर विशेष अनुमत याचिका (SLP) No.३५९३/२०१६ कृषि उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त, गुजरात व इतर या प्रकरणात दि.२९.०२.२०१६ रोजी मा.गुजरात उच्च न्यायालय यांचे प्रकरणात स्थगिती देण्यात आली असुन सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयासमोर अद्याप निर्णयाधिन आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे, या बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतीम होईपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समितीसंदर्भात अपिलार्थी यांनी आयोगासमोर दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोगाने निर्णय पारित करणे यथोचित होणार नाही, या निष्कर्षाप्रत येऊन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम झाल्यानंतर नव्याने माहिती अर्ज सादर करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे उचित ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6129 दिनांक : 16/6/2025

सत्यमेव जयते
छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २५६८/२०२४**
**बोर्ड क्र.२१**

डॉ.लहूकुमार हरिदास खंडाळे,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर,
ता.बदनापूर, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर,
ता.बदनापूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर,
ता.बदनापूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.११.२०२३ | महाविद्यालयाच्या अनुदानित पदावरील सर्व कर्मचाऱ्यांचे बायोमेट्रीक अटेंडन्स त्यांच्या पदनामासहीत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. अपिलार्थी स्वत: संबंधित महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असल्यामुळे उपस्थिती विचारात घेऊन वेतन अदा केले जाते किंवा कसे या बाबीची शहानिशा करण्याकरिता बायोमेट्रीक उपस्थितीची माहिती अधिकारातंर्गत मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दि.०७.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती कर्मचाऱ्यांची वैयक्तिक असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबाबतीत असेल ती माहिती देता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दि.१८.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जनहित साध्य करणारी नसल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दृष्ट हेतुने माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी महाविद्यालयातील सर्व त्रयस्थ कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीक उपस्थितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी हे त्याच महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. माहिती अधिकार अधिनियम कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला असुन असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना देखील प्राप्त झालेला आहे. मात्र शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना तो पुरेशा जबाबदारीने करणे अभिप्रेत आहे. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत त्याच कार्यालयातील माहिती, माहिती अधिकारातंर्गत मागणे उचित वाटत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. सदर माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यातून नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होईल, या बाबत अपिलार्थी यांना आयोगाने विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास सांगू शकलेले नाहीत. या परिस्थितीत, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दि.१८.०१.२०२४ रोजी घेतलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन माहितीची मागणी करण्यामागे त्यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6130 दिनांक :- 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०६३३ व १०६३४/२०२४ (०२)
बोर्ड क्र.२४ व २५

श्री.प्रा.भागवत अंकुश कराडकर,
रा.बनगाव, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक,
मॉडेल डिग्री कॉलेज, घनसावंगी, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
मॉडेल डिग्री कॉलेज, घनसावंगी, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, श्री.गणेश आसाराम सुरासे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ.सतिश दांडगे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २४ | ३१.०८.२०२३ | महाविद्यालयातील प्रा.ऋषिबा शिंदे आणि चारुशिला भदरंगे मराठी विषयाच्या प्राध्यापकांच्या नियुक्ती व नियुक्ती रद्द करणेबाबत सविस्तर माहिती अभिलेख देणे, |
| २५ | ३१.०८.२०२३ | क्रीडा निर्देशक यांच्या नियुक्ती विषयक आणि नियुक्ती रद्द विषयक पत्रव्यवहार देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे माहिती प्रगट करावी किंवा कसे याबाबत संबंधित त्रयस्थपक्षास विचारणा करण्यात आलेली आहे. संबंधित त्रयस्थपक्षाने त्यांच्या दि.०४.१०.२०२४ रोजीच्या निवेदनाव्दारे त्यांचेशी संबंधित माहिती कोणास देण्यात येऊ नये, असे कळविलेले आहे. या नंतर अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, त्रयस्थपक्षाने माहिती प्रगट करण्यास दिलेला नकार व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबी विचारात घेऊन, दि.१४.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, कलम ८ (१) च्या अधिन राहुन मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने उपलब्ध करुन देता येणार नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर कार्यवाही केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी दिशाभूल करत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार संबंधित त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6131 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ३३८/२०२४
बोर्ड क्र.२६

श्री.शेख मन्सुर शेख महेबुब,
रा.ग्रीन पार्क कॉलनी, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
ओम शांती ज्युनिअर कॉलेज, अंबड,
ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
ओम शांती ज्युनिअर कॉलेज, अंबड,
ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१०.२०२३ | १.आपल्या महाविद्यालयात कार्यरत कर्मचारी श्री.अमीर खॉन बी.पठाण यांचे प्रथम नियुक्ती आदेश मिळणेबाबत,<br>२.श्री.अमीर खॉन बी.पठाण यांनी जानेवारी २०२० ते सप्टेंबर २०२३ पर्यंत घेतलेल्या किरकोळ रजा व अर्जित रजेच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळणेबाबत,<br>३. जानेवारी २०२० ते सप्टेंबर २०२३ पर्यंत सर्व कर्मचारी यांचे दैनंदिन हजेरी पटाचे छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार नाकारलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका

विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, ओम शांती ज्युनीयर कॉलेज, अंबड, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची म्हणजेच मुद्दा क्र.०१ ची माहिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, ओम शांती ज्युनीयर कॉलेज, अंबड, जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याध्यापक, ओम शांती ज्युनीयर कॉलेज, अंबड, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२३२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6132 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - १६३०/२०२४**
**बोर्ड क्र.२७**

श्री.तुकाराम बाबुरावजी मिसाळ,
रा.मिसाळ कॉम्प्लेक्स, काद्राबाद, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सी.टी.एम.के. गुजराती विद्यालय, सरोजनीदेवी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
सी.टी.एम.के. गुजराती विद्यालय, सरोजनीदेवी रोड, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०९.२०२३ | मा.अधीक्षक वेतन व.भ.नि.नि.पथक जालना यांनी आपल्या शाळेची मंजूर केलेली खालीलप्रमाणे वेतन बिलांची सत्यप्रती,<br>१.माहे जुन २०१८, २. माहे जुलै २०१८, ३. माहे जुन २०१९, ४. माहे जुलै २०१९, ५. माहे जुन २०२०, ६. माहे जुलै २०२०, ७. जुन, जुलै २०२१, ८. जुन, जुलै २०२२, ९. जुन, जुलै २०२३, १०.श्रीमती ए.ए.पारेकर यांचे जून २०१५ ते जुलै २०१८ पर्यंतचे एरिअर्स बील, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२३.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसा देऊन, मागणी केलेली माहिती शाळेतील कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे कलम ८ (त्र) नुसार देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसुन येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०६.११.२०२३ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०६.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केला असल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निर्णय मान्य नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे सर्व त्रयस्थ कर्मचारी यांची मोघमपणे माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यास कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार संबंधित त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. म्हणून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात दिलेला प्रतिसाद योग्य ठरत असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग येत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना त्या सोबत त्यांचे निवेदन दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता, माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6133 दिनांक : 16/6/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ५३३७, ५३३८, ५३४०, ५३३९ व ५३३२/२०२४ (०५)**
**बोर्ड क्र.२९, ३०, ३१, ३२ व ३३**

श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर,
रा.२९, स्वातंत्र सैनिक कॉलनी, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना ... उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना ... उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री.एस.आर.सक्रुंडे व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.एन.बी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी, त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २९ | १६.०२.२०२४ | शालेय समिती ठराव व सूचना दि.०१.०१.२०१६ ते आज रोजी पर्यंत, |
| ३० | १६.०२.२०२४ | शिक्षकांच्या मान्यता शाळा व कॉलेज २००५ ते आज रोजी पर्यंत, |
| ३१ | १६.०२.२०२४ | बिंदु नामावली सन २००६ ते आज रोजी पर्यंत, |
| ३२ | १६.०२.२०२४ | संच मान्यता कॉलेज (नवभारत) कला व विज्ञान सन २००६ ते आज रोजीपर्यंत, |
| ३३ | १६.०२.२०२४ | विज्ञान शाखेच्या अनुदान मागणी अर्जाचे संचिका सन २०१६ पासुन आजपर्यंत ठरावासह, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.०३.२०२४ रोजीच्या पाच प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता काही कालावधी देण्यात यावा. सदर मागणी केलेली माहिती आयोगाने

निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याध्यापक, श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6134 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०७३० व १०७३१/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.३४ व ३५**

श्री. शेख शाहिबाज आयाज,
रा.मेन रोड, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, परिक्षेत्र उत्तर जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव),
वन विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.पी.टी.ढमाळ, लेखापाल व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्री.एस.एन. मुंढे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३४ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत येणारे सर्व संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या मार्फत केलेल्या वनविषयक कामाचे कामनिहाय समितीनिहाय कॅश बुकच्या सत्य छायांकित प्रती द्याव्यात, |
| ३५ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत राज्य योजने अंतर्गत प्राप्त अनुदानातुन झालेल्या सर्व वनविषयक कामाचे राज्य योजना कॅशबुकच्या सत्य छायांकित प्रती द्यावेत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे सदर माहिती दि.३०.०९.२०२४ रोजी अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना दि.२४.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाव्दारे कळविण्यात आलेले आहे. तथापि सदर पत्राच्या अनुषंगाने कार्यालयात उपस्थित राहुन माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना अवलोकनास्तव बोलावून १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.०४.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, दि.२०.११.२०२४ रोजी माहितीचे अवलोकनाकरिता कार्यालयात उपस्थित राहण्याचे अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. तसेच नमूद दिनांकास

हजर न राहिल्यास माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरण्यात येईल, असे अपिलार्थी यांना याच पत्राव्दारे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात माहितीचे स्वरुप विचारात घेऊन त्यांना वेळोवेळी अवलोकनाची संधी देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी अवलोकन करुन हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जोडपत्र अ ची दखल घेतली नाही, प्रथम अपील आदेशाचे पालन केले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेल्या बाबीच्या अनुषंगाने माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयानुसार अपिलार्थी यांना पुन:श्च अवलोकन करण्याची संधी दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही आणि अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे देखील दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6135 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०७३२ व १०७३३/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.३६ व ३७**

श्री. शेख शाहिबाज आयाज,
रा.मेन रोड, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, परिक्षेत्र दक्षिण जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव),
वन विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.व्ही.एम.दौंड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्री.एस.एन.मुंढे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३६ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत राज्य योजने अंतर्गत प्राप्त अनुदानातुन झालेल्या सर्व वनविषयक कामाचे राज्य योजना कॅशबुकच्या सत्य छायांकित प्रती द्यावेत, |
| ३७ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत येणारे सर्व संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या मार्फत केलेल्या वनविषयक कामाचे कामनिहाय समितीनिहाय कॅश बुकच्या सत्य छायांकित प्रती द्याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी करताना ती मोघमपणे केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नसल्यामुळे सुस्पष्ट व अचुक माहितीची मागणी करण्यात यावी, असे अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन, माहितीचे अवलोकनाकरिता अपिलार्थीस बोलावून १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन १५ दिवसात अवलोकन देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जोडपत्र अ ची दखल घेतली नाही, प्रथम अपील निर्णयाचे पालन केले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रा), दक्षिण जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), वन विभाग, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6136 दिनांक : 16/6/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ११०२७, ११०२९, ११०३० व ११०३१/२०२४**
**बोर्ड क्र.३८, ३९, ४० व ४१ (०४)**

श्री.सौदागर जलील अहेमद अकबर मियाँ,
रा.गोंदी, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, परिक्षेत्र दक्षिण जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव),
वन विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२७.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ श्री.एम.एम.शेख, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.व्ही.एम.दौंड आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्री.एस.एन.मुंढे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३८ | ०३.०८.२०२४ | मा.उपवनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र दिनांक सॉमील ७४४३/२०२४ दि.३१.०७.२०२४ व आपले कार्यालय पत्र सॉमिल/१८४ दिनांक १२.०७.२०२४ देण्यात आलेला अहवाल यांची प्रत मिळणे, |
| ३९ | २०.०९.२०२४ | उपवनसंरक्षक वन विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.ब/आगी/सौदागर सॉमिल / १४४३/२०२४-२५ दिनांक ३१.०७.२०२४ पत्रानुसार सहायक वनसंरक्षक जालना यांचे कार्यालय पत्र १.सकस/सौदागर/सॉमिल/१८४/२४ दिनांक १२.०७.२०२४ व सकस / सौदागर सॉमिल / २३३ २०२४-२५ दिनांक ०५.०८.२०२४ देण्यात आलेल्या अहवाल नुसार आरागिरणी परवाना संदर्भात कोणते निष्कर्ष पर्यंत पोहचले आहेत व त्याचा आधार काय आहे त्या संबंधित सर्व कागदपत्र कार्यालयीन टिपणसहीत प्रमाणित प्रतीत माहिती मिळणेबाबत, |
| ४० | १६.०९.२०२४ | माझा विनंती अर्ज (एसएलसी-१३/२०१६) अन्वये (कार्यालयीन पोच दिनांक ०८.०७.२०२४) प्रकरण बाबत विनंती अर्ज प्रमाणे आपल्या कार्यालय मार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली कार्यालयीन टिपण सहीत प्रमाणित प्रत मिळणेबाबत, |
| ४१ | २३.०९.२०२४ | मा.उपवनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र ब / आगी / सौदागर सॉमिल / ६९९ / २४-२५ दिनांक ०७.०६.२०२४ अनुसरुन आपल्या कार्यालयात पाठविण्यात आले होते, |

| | | |
|---|---|---|
| | | सदरील पत्रान्वये संदर्भ क्र.७ आअपल्या कार्यालयात विभागाकडुन कोणते दस्ताऐवज प्राप्त झाले त्याची सुचि व छानना केलेले दस्ताऐवज सुचि कार्यालयीन टिपणीसहीत प्रमाणित करुन देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करुन सदर कार्यालयाने कोणतीही दखल घेतलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी चुकीचे उत्तर देऊन दिशाभूल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढलेले आहेत. अद्याप माहिती दिली नसल्यामुळे ती कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वेळोवेळी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेले संदर्भ हे सहायक वनसंरक्षक यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. या उपर अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसात माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. अत: अपिलार्थी यांना त्यांच्या चारही माहिती अर्जाव्दारे हवी असलेली माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), वन विभाग, जालना यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), वन विभाग, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6138 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ११०२८/२०२४
बोर्ड क्र.४२

श्री.सौदागर जलील अहेमद अकबर मियाँ,
रा.गोंदी, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वन विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२७.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०९.२०२४ | १. शासन परिपत्रक क्र.एसडब्ल्युएम / १०८१ / १०६८३६ / दि.१६.०७.१९८१ अन्वये / नुसार आरागिरणी धारकांना परवाना प्राप्त / परवाना मिळणेसाठी कोणकोणतील आवश्यक कागदपत्रे (अटी) देणे बंधनकारक आहे / होती याची माहिती शासन परिपत्रकासह सविस्तर यादी पुरविण्यात यावी,<br>२. शासन परिपत्रक क्र.एसडब्ल्युएम / १०८१ / १०६८३६ / दि.१६.०७.१९८१ डेप्युटी सेक्रेटरी रिव्हेन्यू अँड फॉरेस्ट डिपार्टमेंट यांचे आदेश swrn / १०८१/१०६८३६ दि.२९ ऑगस्ट या व्दारे सॉमिल धारकांनी परवाना अर्ज सादर करण्यासाठी दि.३०.०९.१९८१ ही तारीख निरधारी करण्यात आली होती, त्यासाठी आपल्या स्तरावर / विभागा मार्फत संबंधित (आरा मशीन धारकांना) याची सुचना / अंमलबजावणी होण्यासाठी कोणत्या माध्यमातुन जसे सुचना / प्रसिध्दी / जाहिरात देण्यात आली त्याची पूर्ण संचिका / केलेल्या कारवाईची प्रमाणित प्रत देण्यात यावी,<br>३. मा.मुख्य वन संरक्षक (संधारण) म.रा.,पुणे यांचे कडील कक्ष ११ / सॉमिल / कि / ४५४ / दि.८५-८६ / दि.०६.०३.१९८६ अन्वये (सौदागर सॉमिल गोंदी) आरागिरणी प्रकरणाबाबत आपले स्तरावरुन झालेल्या संपूर्ण पत्रव्यवहार याची पूर्ण संचिका प्रमाणित करुन कार्यालयीन टिपणी सहीत देण्यात यावी, तसेच ज्या आधारावर निर्णय घेण्यात आले त्या आधाराचे पूर्ण कागदपत्राची प्रमाणित प्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२४.१०.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात वेळेत कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (वनीकरण), वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही) १६/६

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6139 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक (प्रादेशिक), वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक - ३४७/२०२४
बोर्ड क्र.४३

श्रीमती शहनाज बानु, — अपिलार्थी
रा.प्लॉट नंबर २२, २३, बिबी का मकबऱ्या पाठीमागे, रेणुकामातानगर, ताज कॉलनी जवळ, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.०१, जालना, बांधकाम परिसर, दूर्गा माता मंदिराजवळ, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.१०.२०२३ | दि.01.04.2022 ते दि.15.10.2023 सदरील कालावधीत, Consultancy Services for authoritys Engineer for Supervision of Rehabilitation and up gradation to 2 lane with paved shoulder / 4- lane standards of National Hoghway section (i) Sillod - Ajanta - Fardapur section of NH753-F- Design chaingage K.M.60.630 to 99.660 (L-39.03 KM) & Section (ii) Fardapur- Jalgaon section of NH-753 F design chainage K.M. 99.66 to 147.38 (L=47.720 km) on EPC Mode - M/s Planning & Infrastructural Development consultants Pvt.Ltd.Patna यांचे मार्फत वरील कामासाठी लावण्यात आलेले 1. Key Professional staff, 2. Sub Professional staff, यांची गेल्या दीड वर्षाची (दि.01.04.2022 ते दि.15.10.2023) मासिकनिहाय नावासह, हुद्यासह (सर्व स्टाफ, सिललोड पॅकेज-2 व जळगाव पॅकेज-3 येथील) त्यांच्या उपस्थिती अहवालाची छायांकित व प्रमाणित प्रती माहिती देण्यात यावी, दोन्ही सिल्लोड व जळगाव कार्यालयाची स्वतंत्रपणे अहवाल देण्यात यावा, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम

अपिलावर दि.२९.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दि.०७.०१.२०२४ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०१.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र.०१, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली (पूर्वी दिलेली माहिती वगळून) माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6/40 दिनांक : 16/6/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९१८३/२०२४
बोर्ड क्र.४४

श्री.सुनिल गणपत गडकर, — अपिलार्थी
रा.घर नंबर ५/०४/२४, काजीवाडा, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
आर.जी.बागडिया कॉमर्स अँड आर.बेझंजी सायन्स कॉलेज, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य,
आर.जी.बागडिया कॉमर्स अँड आर.बेझंजी सायन्स कॉलेज, जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०६.२०२४ | प्रा.डॉ.दिलिप अर्जुने, अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांच्या विषयी माहिती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ नुसार प्रतिज्ञापत्र बाबत, यांचे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमुना अ (नियम ४) याची प्रमाणित छायांकित प्रत मिळणेबाबत, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०८.०७.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०३.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन दि.१९.०९.२०२४ रोजीच्या निर्णयाव्दारे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, वैयक्तिक माहिती देण्यास असमर्थ असल्याचे कळवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची नसुन ती कार्यालयीन कामकाजाच्या शिस्तीनुसार कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती आहे. माहिती अर्जानुसार ज्यांच्या संदर्भात माहितीची मागणी केलेली आहे त्यांना दोन पेक्षा अधिक अपत्य असुन या बाबीची कागदोपत्री शहानिशा करण्याकरिता या माहितीची आवश्यकता आहे. त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, वैयक्तिक माहिती म्हणून देण्याचे टाळण्यात येत आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, आर.जी.बागडिया कॉमर्स अँड आर.बेझंजी सायन्स कॉलेज, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, आर.जी.बागडिया कॉमर्स अँड आर.बेझंजी सायन्स कॉलेज, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्राचार्य, आर.जी.बागडिया कॉमर्स अँड आर.बेझंजी सायन्स कॉलेज, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. सहसंचालक (उच्च शिक्षण), छत्रपती संभाजीनगर विभाग, पदमपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6141 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
सहसंचालक (उच्च शिक्षण), छत्रपती संभाजीनगर विभाग, पदमपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७०५/२०२४
बोर्ड क्र.६५

श्री.प्रविण भिमराव भिंगारदेव, — अपिलार्थी
रा.मस्त्योदरी कॉलनी, अंबड, ता.अंबड, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, भिवंडी बोडखा, ता.अंबड, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आर.एस.काळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.ए.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०७.२०२३ | सन २०१९ ते ०७ एप्रिल २०२३ पर्यंतची बँक खाते तपशिल, कॅशबुक, धनादेश नोंदवहीसह ग्रामसभेचा अहवाल रजिस्टर, मासिक मिटींगचा अहवाल, सोबत हालचाल रजिस्टर, आवक-जावक रजिस्टर देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडुन प्राप्त करुन घेतलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्याप्रमाणे दि.०८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादानुसार त्यांना माहिती

प्राप्त झाली नसल्यास ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे पुन:श्च उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भिवंडी बोडखा, ता.अंबड, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.शा.इं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6152 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ५३५८, ५३५९ व ५३६५/२०२४ (०३)**
**बोर्ड क्र.६६, ६७, ६८**

श्री.विठ्ठल सुधाकर शेरे,
रा.शेवगा, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, शेवगा, ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०२.२०२४ व दि.२०.०५.२०२४ (०२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती आर.बी.पैठणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.ए.ए.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६६ | २२.०८.२०२३ | सन २०१५ ते २०२१, १.वार्षिक लेखा विवरणे / लेखा परीक्षण अहवालच्या मागणी तीन वर्षातील कॉपीज देणे, २. मागील तीन लेखा परीक्षण अहवालावर लेखा परीक्षकांनी दिलेली टिपणी, वित्तीय काढलेल्या त्रुटी व त्यास ग्रामपंचायतीने दिलेले उत्तर, केलेली सुधारणा या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती देणे, ३. सर्व लेखा परीक्षण अहवाल त्या त्या प्रत्येक वर्षामध्ये ग्रामसभेत सादर केले असल्यास ग्रामसभेच्या ठराव व इतिवृत्ताची छायाप्रत देणे, ४. लेख परीक्षण सादर केलेल्या ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या सर्व ग्रामस्तांच्या उपस्थिती स्वाक्षरी / अंगठा असलेल्या ग्रामसभा उपस्थिती रजिस्टरची छायाप्रत देणे, |
| ६७ | २२.०८.२०२३ | १.आपल्या ग्रामपंचायत दफ्तर नोंदवही नमुना आठ मधील ज्या नवीन नोंद तसेच नवीन बदल म्हणजे फेरफार ज्या पुराव्याने नोंद केला आहे ते सर्व नोंदीची यादी व संबंधित पुराव्याची सत्यप्रत व गावठाण मधील व गावठाण बाहेरील या उल्लेखासह फेरफारचे पुराव्यासह सत्यप्रत मिळणे, २. आपल्या ग्रामपंचायतने सन २०११ ते २०२३ (आजपर्यंत) ग्रा. दफ्तरी फेरफार केले त्याची पुराव्यासह व आपल्या ग्रा. जो ठराव पास केला त्या ठरावाची सत्यप्रत तसेच संबंधित कागदपत्राची सत्यप्रत द्यावी, ३. आपल्या ग्रामपंचायत दफ्तर नोंद वही नमुना आठ मधील मिळकत क्र.२९१/१ व ४०७ च्या फेरफार (सर्व प्रकार) ज्या कागदपत्राआधारे केले त्या कागदपत्राची सत्यप्रत मिळणे |
| ६८ | २२.०८.२०२३ | आपल्या ग्रामपंचायत दफ्तर नोंदवही नमुना आठ मधील मिळकत क्र.२९१/१ व ४०७ च्या फेरफार (सर्व प्रकार) ज्या कागदपत्राआधारे केले त्या कागदपत्राची सत्यप्रत मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सध्या कार्यरत जन माहिती अधिकारी यांच्यापूर्वी जे ग्रामसेवक कार्यरत होते ते श्री.व्ही.पी.झिने यांनी कार्यवाही केलेली कागदपत्रे मिळालेली नाहीत. सदर कागदपत्रांची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी दि.०१.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याची बाब विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दि.०५.१२.२०२३ रोजी देऊन तसा अनुपालन अहवाल सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील जी कागदपत्रे पदभार स्विकारताना पदभारात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहेत ती कागदपत्रे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. मात्र जी कागदपत्रे पदभारात मिळालेली नाहीत अशा कागदपत्राची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता आलेली नाहीत. सदर उर्वरित माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी काही माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उर्वरित माहितीसंदर्भातील अभिलेखे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झाले नसल्यामुळे अशी उर्वरित माहिती उपलब्ध करुन देता आली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. अत: अपिलार्थी यांनी मागणी केलेली उर्वरित माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि.जालना यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6143 दिनांक : 16/6/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, जि.जालना

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६७३५/२०२४
बोर्ड क्र.६९

श्री.शेख सादीक शेख इस्माईल,
रा.हारतखेडा, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हारतखेडा, ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.ए.घुगे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.ए.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०४.२०२३ | जल जिवन मिशन, १४, १५ वा वित्त आयोगामार्फत झालेल्या कामाचा खर्च व कोठे खर्च केला याची माहिती, मौजे हारतखेडा घरकुल अंतर्गत झालेल्या व कोणत्या जागेवर झालेल्या कामाची चौकशी करुन प्रत्यक्ष माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०५.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.१३.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दि.१९.०६.२०२४ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१८.०६.२०२४ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्विकारुन, मागणी केलेली माहिती मिळाली आहे, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, ग्रा.पं. अंतर्गत कामात अनियमितता व भ्रष्टाचार, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी पोच दिली असल्याचे

दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना त्यामध्ये नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहितीबाबत त्यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6155 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७०२४/२०२४**
**बोर्ड क्र.७०**

श्री.श्रीहरी पांडुरंग निर्मळ,
रा.पाथरवाला बु., ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पाथरवाला बु., ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०४.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आर.एस.वाबळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.ए.ए.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०३.२०२३ | जानेवारी १९६० ते जानेवारी १९७४, श्रीपती गणपती यांच्या नावे असलेल्या तपशिल देण्यात यावा, कारण सी.टी.सर्वे नंतर जागेत फरक करण्यात आला आहे, |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१०.०४.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.१६.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दि.२२.०५.२०२४ रोजी पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी यापूर्वी कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा

कालावधी जानेवारी १९६० ते जानेवारी १९७४ असा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पाथरवाला बु., ता.अंबड, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पाथरवाला बु., ता.अंबड, जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशा

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6145 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७८९४/२०२४
बोर्ड क्र.७१

श्री.सोनाजी सत्यभान येडे, — अपिलार्थी
रा.हरतखेडा, पो.शेवगा, ता.अंबड, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, हरतखेडा, ता.अंबड, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.ए.घुगे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.ए.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०१.२०२४ | सन २०२० ते २०२३ मध्ये मौजे हरतखेडा येथे १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग, दलित वस्ती व पेयजल योजने अंतर्गत झालेल्या कामाचे इस्टिमेट, एम.बी. व बँक स्टेटमेंट मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.२१.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दि.२७.०३.२०२४ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.२६.०३.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्विकारुन, मागणी केलेली माहिती मिळालेली आहे, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती द्यावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व उपलब्ध करुन दिलेली

माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6146 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८३९८, ८३९९ व ८४००/२०२४ (०३)
बोर्ड क्र.७२, ७३ व ७४

श्री.विद्यानंद विक्रमराव वाघ,
रा.माहेरभायेगाव, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, माहेरभायेगाव, ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०६.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एच.बी.राऊत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.व्ही.बी.बानाटे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७२ | ०१.०६.२०२४ | १.दि.१६.०४.२०२२ च्या मासिक सभेचा इतिवृत्तांत, २. जिल्हा परिषद शाळा माहेरभायगावचे अधिग्रहित क्षेत्र, ३. जिल्हा परिषद शाळा माहेरभायगावच्या क्षेत्रावरील अतिक्रमणाचा तपशिल, ४. ग्रामपंचायत माहेरभायेगाव यांच्या म्हणण्यानुसार जिल्हा परिषद शाळेच्या जागेवरील अतिक्रमित विक्रमराव रामराव वाघ यांचा ८ अ रद्द करण्यात आला त्याचा तपशिल व त्या संबंधी ग्रा.पं. अधिकाराचा तपशिल, |
| ७३ | ०१.०६.२०२४ | ग्रामपंचायत माहेरभायगाव, १. सन २०२१-२०२२ ऑडिट रिपोर्ट, २.सन २०२२-२०२३ ऑडिट रिपोर्ट, ३.सन २०२३-२०२४ ऑडिट रिपोर्ट, |
| ७४ | ०१.०६.२०२४ | सन २०२१-२२ या कालावधीत ग्रा.पं. माहेर भायगावचा वार्षिक विकास आराखडा, आराखड्यानुसार झालेला कामांचा तपशिल, झालेल्या कामाची देयके (बील), |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि सदर निर्णयानुसार देखील माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि कामाच्या व्यापात अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस वेळेत देता येणे शक्य झालेले नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याचा अथवा माहिती दडविण्याचा कोणताही असद् हेतु नव्हता. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जांव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन दि.०२.०६.२०२५ रोजी पोस्टाव्दारे पाठविण्यात आलेली आहे. तसेच सदर माहितीचा एक संच अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता आज रोजी सोबत देखील आणलेला आहे. आयोगाने निर्देशित केल्यास तो अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दि.०२.०६.२०२५ रोजी पोस्टाने पाठविली असल्याचे तसेच मागणी केलेल्या माहितीचा एक संच अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. सदर माहितीचा संच आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो आयोगासमोर स्विकारलेला आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांची तीनही विचाराधिन व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6147 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०६८/२०२४
बोर्ड क्र.७५

श्री.जगदीश भानुदास गायकवाड, — अपिलार्थी
रा.इब्राहिमपूर, ता.भोकरदन, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, इब्राहिमपूर, ता.भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.डी.डी.कोळी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.गजानन श्री.पाखरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१२.२०२३ | सदरील कालावधीत वर्षनिहाय आपले ग्रा.पं. हद्दीत मंजूर झालेले घरकूल, पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकूल आवास योजना, घरकूल लाभासाठी लाभार्थ्यांचे जोडलेले कागदपत्राची संचिका कोमा गाव नमुना नं.०८ चा उतारा आतापर्यंत लाभार्थीनिहाय वाटप करण्यात आलेल्या घरकूल अनुदान रक्कम / हफ्ता आज रोजी चालू असलेले कोमा व अपूर्ण घरकुलाची यादी स्वरुप फोटो, या करिता एकूण राशी आतापर्यंत मंजूर झालेल्या किती लाभार्थ्यांना घरकूल रक्कम दिली व किती लाभार्थी बाकी आहे या बाबत घेतलेली ग्रामसभा याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांना दि.०२.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये कथन

केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन तशी पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6128 दिनांक : 16/6/2025

राज्य माहिती आयोग
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०६९/२०२४**
**बोर्ड क्र. ७६**

श्री.जगदीश भानुदास गायकवाड, — अपिलार्थी
रा.इब्राहिमपूर, ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, इब्राहिमपूर, ता.भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.डी.डी.कोळी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.गजानन श्री.पाखरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१२.२०२३ | १.आपल्या ग्रामपंचायत हद्दीमधील झालेल्या एकूण वृक्ष लागवडी संदर्भात माहिती कोमा ठिकाणी वृक्षाचा प्रकार या करिता ग्रामसभेचा ठराव, शासनाचे आदेश, शासन परिपत्रक या कामी प्राप्त निधी लेखा जोखा आदी स्वरुपाची माहिती.<br>२. आपले ग्रामपंचायत हद्दीतील अंडरग्राऊंड नालीबांधकाम कोणत्या योजनेमार्फत करण्यात आली त्याची इस्टीमेटची छायांकित प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन तशी पोच देखील दिलेली आहे. मात्र आज रोजी सदर पोच संचिकेमध्ये आढळ होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुन:श्च उपलब्ध करुन देऊन तशी पोच आयोगाच्या पटलावर उलटटपाली सादर करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे त्यांनी अवगत केलेले आहे. मात्र माहिती दिल्याची पोच त्यांच्याकडे उपलब्ध नाही. म्हणून आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पुन:श्च माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश:

पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित असुन ती विस्तृत स्वरुपाची आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इब्राहिमपूर, ता.भोकरदन, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर म्हणजे मुद्दा क्र.०१ ची माहिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6149 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ५७१४/२०२४**
**बोर्ड क्र.७७**

श्री.आनंदा पंडीत कानडे,
रा.करजगाव, ता.भोकरदन, जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, करजगाव, ता.भोकरदन, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, वर्तमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सपकाळ सुखदेव तुळशीराम, वर्तमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.सोनुने पांडुरंग वामन व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.पाखरे गजानन श्रीराम उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०१.२०२४ | ग्रा.पं. कार्यालय करजगाव येथे १५ वित्त आयोग २०२३-२०२४ मध्ये झालेल्या कामाचे इस्टीमेट, एम.बी., सी.सी., साहित्य खरीदीचे व्हावचर मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १२ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर

सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि कामाच्या व्यापात माहिती उपलब्ध करुन देण्याचे राहुन गेलेले आहे. सदर मागणी केलेली माहिती विनाविलंब उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, करजगाव, ता.भोकरदन, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, करजगाव, ता.भोकरदन, जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही) ११/६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6150 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७८८९/२०२४**
**बोर्ड क्र.७८**

श्री.सुरेश गंगाराम बनकर,
रा.महात्मा फुले नगर (धनगरवाडी), भोकरदन,
ता.भोकरदन, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, भोकरदन, जि.जालना — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री.एस.आर. जगताप उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०३.२०२४ | भोकरदन तालुक्यातील वाकडी, ताडकळस, बोरगाव, कोळेगाव, दमडवाडी, गारखेडा, जोमाळा, कुंभारी, पोखरी, तडेगाव, वालसावंगी, अन्वा, लिंगेवाडी, पारध या ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत ग्रामसेवक / ग्रा.अधिकारी यांनी दाखल केलेल्या घरभाडे भत्तासाठी दिलेल्या पावत्या तसेच ग्रामसभेच्या ठरावाची नक्कल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१४.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन दि.०९.०७.२०२४ रोजी गट विकास अधिकारी यांना उद्देशुन निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी असे नमूद केलेले आहे की, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली असुन जी माहिती दिली त्यात ग्रामविकास अधिकाऱ्यांनी बोगस व बनावट घरभाडे पावत्या व ग्रामसभेचे ठराव दिलेले आहेत, वास्तविक मुख्यालयी वास्तव्य करुन राहत नसताना मुख्यालयी वास्तव्य करुन राहत असल्याच्या घरभाडे पावत्या, ग्रामसभेचे बनावट ठराव देऊन दिशाभूल केल्याप्रकरणी संबंधितांवर भा.द.वी.कलमानुसार गुन्हे दाखल करावे. अपिलार्थी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या दि.१८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविलेले आहे की, ग्रामपंचायत ही

स्वायत्तसंस्था असल्याने त्यांनी जे ठराव पारित केलेले आहेत ते बोगस व दिशाभूल ठरविण्याचे अधिकार पंचायत समिती कार्यालयास नाहीत. वास्तविक अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखावर जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आली असल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूलक करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत त्यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6151 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -८३८९/२०२४
बोर्ड क्र.७९

श्री.राजु दास आव्हाड, — अपिलार्थी
रा.रुम नंबर १७४, जय मुरत नगर, पाठक चाळ, दिनकारी रोड,
पांजरापोळ, चेंबुर, मुंबई

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मालखेडा, ता.भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

(सुनावणी दिनांक.०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०३.२०२४ | १. सन २०१९-२० ते २०२२-२३ साली मिळकत क्रमांक २७२ नावे असलेल्या इसमाचे नाव व पत्ता मिळणेबाबत,<br>२. सदर मिळकत ज्या कागदपत्राच्या आधारे नावे झाली त्या सर्व कागदपत्राची सत्यप्रत,<br>३. सदर इसमाचे मालमत्तेवर नाव लावतानाचा घेतलेला ठराव,<br>४. सदर मालमत्ता नावावर करण्याआधी नावे असणाऱ्या इसमाचे सहमती पत्र किंवा हक्कसोड पत्र मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एकत्रित व संकलित करण्याकरिता काही कालावधी लागला असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. सदर एकत्रित व संकलित केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज

कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेल्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपिलाचा अर्ज गट विकास अधिकारी यांचेकडे सादर केला असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या, प्रथम अपिलाचा अर्ज अप्राप्त असल्याच्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसुन येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निदेशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदरची माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6152 दिनांक : 16/6/2025
6152

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८४८३ व ८४८४/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.८०,८१**

श्री.विठ्ठलसिंग रामराव मोरे, — अपिलार्थी
रा.पारध खुर्द, पो.पारध बु., ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पारध खुर्द, ता.भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.शुभम पवार व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.गजानन पाखरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८० | १३.०१.२०२४ | १. दि.०१.०४.२०२२ ते ३१.१२.२०२३ चे कामाचा आढावा व त्यावरील खर्चाचा तपशिल मिळण्याबाबत, २. त्या निधीमध्ये कोणकोणते काम करण्यात आले, ३.ग्रामपंचायत बँक खात्याचे स्टेटमेंट, ४.मंजूर झालेली कामे कोणी केले त्याचा तपशिल, ५.मंजूर झालेली कामावर प्रत्येक कामावर किती खर्च केला व चेकव्दारे किती पैसे दिले, ६. कुठे किती खर्च केला व त्याचा पावत्या खरेदी केलेल्या वस्तुचे बिल मिळणेबाबत, |
| ८१ | ०४.०३.२०२४ | १. दि.०१.०४.२०२१ ते ३०.११.२०२३ वित्त आयोगाच्या कामाचा आढावा व त्यावरील खर्चाचा तपशिल मिळणेबाबत तसेच २५/१५ ची किती कामे करण्यात आली याबाबत माहिती, २. ग्रामपंचायत बँक खात्याचे बँक स्टेटमेंटची छायांकित प्रत देण्यात यावी, ३. मंजुर झालेली कामे कोणी केली त्याचा तपशिल, ४. वित्त आयोगाचा पैसा कोणकोणत्या कामावर खर्च केला त्याचे व्हावचर व पावत्याची छायांकित प्रत, ५. प्रत्येक घेण्यात आलेल्या मिटींगमध्ये घेण्यात आलेल्या ठरावाची छायांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली काही माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जाव्दारे ज्या कालावधीची माहिती मागितलेली आहे त्यापैकी केवळ दि.३०.०८.२०२३ पूर्वीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि दि.३०.०८.२०२३ नंतरच्या कालावधीची माहिती अद्याप मिळालेली नाही. म्हणून उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच एक महिन्यापूर्वी नव्याने स्विकारलेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय जी माहिती प्राप्त झालेली नाही त्याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, माहिती न देण्याचे कारण स्पष्ट न करणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पारध खुर्द, ता.भोकरदन, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली (पूर्वी दिलेली माहिती वगळून) माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

५।११।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6153 दिनांक : 16/6/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -८४८५/२०२४
बोर्ड क्र.८२

श्री.विठ्ठलसिंग रामराव मोरे, — अपिलार्थी
रा.पारध खुर्द, पो.पारध बु., ता.भोकरदन, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता (बांधकाम),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री.एस.सी.शेजुळ उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०२.२०२४ | १.ग्रामपंचायत कार्यालय पारध खुर्द येथे गावामध्ये सिमेंट रोडचे काम झाले असुन सदरील कामाचे इस्टीमेटची छायांकित प्रत देण्यात यावी,<br>२. सदर काम सुरु होताना, काम प्रगतीपथावर असताना व काम पूर्ण झाल्यानंतर जे.ई. सोबत काढलेल्या छायाचित्राची प्रत देण्यात यावी,<br>३. काम सुरु करण्यापूर्वीचे जीपीएस लोकेशन दर्शविणारे छायाचित्राची प्रत देण्यात यावी,<br>४. जिओ टॅग फोटो व जीपीएस लोकेशन दर्शविणारे फोटो देण्यात यावे,<br>५. दि.०१.०२.२०२४ रोजी माहिती अधिकाराखाली दिलेल्या अर्जातील राहिलेली अपूर्ण माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कार्यालयात येऊन माहिती घेऊन जावी, असे नोंदणीकृत टपालाव्दारे कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना कळविल्याप्रमाणे ते कार्यालयात आले नसल्यामुळे माहितीचे प्रदान झालेले नाही.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्यास ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निदेशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदरची माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 6154 दिनांक : 16/6/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -११०९८/२०२४
बोर्ड क्र.८३

श्री.रमेश जाणु गवळी, — अपिलार्थी
रा.सुरंगळी, ता.भोकरदन, जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सुरंगळी, ता.भोकरदन, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

(सुनावणी दिनांक ०४.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.गजानन श्री.पाखरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०८.२०२४ | मोजे सुरंगळी येथील सुरंगणी ते जळगाव रस्त्यावर भगवान भावराव भोंडे यांच्या बांधकामाच्या जागेचा नमुना नं.०८ नक्कल मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१४.१०.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील ही बाब व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली

नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरंगळी, ता.भोकरदन, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरंगळी, ता.भोकरदन, जि.जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6155 दिनांक : 16/6/2025